**शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून राज्यातील विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी विनाअनुदानित संस्थेत नवीन अभ्यासक्रम, सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ, इ. साठी फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या परवानगीस अनुसरून शासनाची मान्यता देण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्र.टीईएम-२०२१/प्र.क्र. ११०/तांशि-४**

मादाम कामा रोड, हुतात्मा चौक राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २९ जुलै, २०२१.

<u>वाचा</u> : १) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र. २/एनजीसी/२०२१/५७५, दिनांक ०१/०७/२०२१.
२) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र. २/एनजीसी/२०२१/५८८, दिनांक ०६/०७/२०२१.
३) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र. २/एनजीसी/२०२१/६०९, दिनांक १२/०७/२०२१.
४) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र. २/एनजीसी/२०२१/६१७, दिनांक १३/०७/२०२१.

<u>प्रस्तावना</u> :

संचालक, तंत्रशिक्षण यांनी वर नमूद क्रमांक १ ते ४ येथील पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून राज्यातील विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित संस्थेत नवीन अभ्यासक्रम, सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ इ. साठी फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या परवानगीस अनुसरून शासन निर्णय निर्गमित करणे इ.बाबत शासन मान्यता देण्यासाठी प्रस्तावित केले आहे.

संचालक, तंत्रशिक्षण यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सोबतच्या Annexure "A" मधील संस्थांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित संस्थेत नवीन अभ्यासक्रम, सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ इ. साठी फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या परवानगीस अनुसरून मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरून संचालक, तंत्र शिक्षण यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे, शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ पासून सोबतच्या Annexure “A” मधील संस्थांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे विद्यमान कायम विनाअनुदानित औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सध्याच्या प्रवेश क्षमतेत वाढ इ.बाबत खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

१) सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेचे प्रवेश क्षमता वर नमुद केल्याप्रमाणे राहील.

३) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली / फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

६) शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत . तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

९) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग अ
१९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

२. याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

३. ज्या संस्थांनी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रोसेसिंग फी अदा केलेली नाही, त्या संस्थांकडून संचालकांनी अंतीम मान्यता देण्यापूर्वी ती वसूल करावी व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये या शासन मान्यतेनुसार अभ्यासक्रमाचा समावेश होण्याकरिता संचालक, तंत्र शिक्षण यांनी आवश्यक ते आदेश पुढील १० दिवसाच्या आत निर्गमित करावेत.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक **२०२१०७२९१२१४५८७२०८** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay Audumbar Dharurkar

Digitally signed by Sanjay Audumbar Dharurkar
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=637145fd393d6d5c713e94e6da7bc6bee23011448b7fc64d138630b9c76ae7a2, pseudonym=31CA7ED219B337702778F999599C5B0A61B033A1, serialNumber=FCF7172A73579B34FA622983D8FB647780FBEF1D35A1CA975955EB9193F3F800, cn=Sanjay Audumbar Dharurkar
Date: 2021.07.30 17:42:23 +05'30'

**( संजय औ.धारुरकर )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
३. सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
४. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
५. संबंधित संस्था (संचालक,तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
६. फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया,कम्बाइन्ड काऊन्सिल बिल्डींग, कोटला रोड, ऐवान-इ-गालिब मार्ग, नवी दिल्ली-११० ००२.
७. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११०००१.
८. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.
९. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई.
१०.निवड नस्ती/तांशि-४

**Annexure A**

**Higher Technical Education Department, Government Resoulation No.TEM-2021/C.R.110/TE-4, Dated- 29 July, 2021.**

**List of New Course, Increase in intake in existing Unaided Pharmacy institute, Approved by PCI for A.Y. 2021-22**

| SR. No. | DTE Code | PCI Code | Institute Name | District Name | Region Name | ProgramName | University Name | Course Name | Intake Approved by Govt. A.Y.2020-21 | Intake Approved by PCI A.Y.2021-22 | Variation | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 29 | 6890 | PCI-577 | Teerthankar Education Society's Dr. Shivajirao Kadam College of B.Pharmacy, Kasbe Digraj Sangli | Sangli | Pune | Master of Pharmacy | Shivaji University | Pharmaceutical Chemistry | 0 | 15 | **15** | New Course |
| 30 | 6890 | PCI-577 | Teerthankar Education Society's Dr. Shivajirao Kadam College of B. Pharmacy, Kasbe Digraj Sangli | Sangli | Pune | Master of Pharmacy | Shivaji University | Pharmacology | 0 | 15 | **15** | New Course |
| 31 | 2592 | PCI-658 | GAJANAN MAHARAJ COLLEGE OF PHARMACY, NIPANI, AURANGABAD | Aurangabad | Aurangabad | Bachelor of Pharmacy | Dr. Babasaheb Ambedkar Technological University,Lonere | Pharmacy | 60 | 100 | **40** | Increase Intake |
| 32 | 3464 | PCI-1195 | Viva Institute of Pharmacy, Virar(E) | Palghar | Mumbai | Bachelor of Pharmacy | Mumbai University | Pharmacy | 60 | 100 | **40** | Increase Intake |
| 33 | 6370 | PCI-1629 | Progressive Education Society's Modern College of Pharmacy, Nigdi, Pune | Pune | Pune | Master of Pharmacy | Savitribai Phule Pune University | Pharmacology | 6 | 15 | **9** | Increase Intake |
| 34 | 6370 | PCI-1629 | Progressive Education Society's Modern College of Pharmacy, Nigdi, Pune | Pune | Pune | Master of Pharmacy | Savitribai Phule Pune University | Pharmacutical Chemistry | 6 | 15 | **9** | Increase Intake |
| 35 | 6616 | PCI-1890 | Sant Gajanan Maharaj College of Pharmacy, Gadhinglaj | Kolhapur | Pune | Bachelor of Pharmacy | Shivaji University | Pharmacy | 60 | 100 | **40** | Increase Intake |
| 36 | 6256 | PCI-247 | Bharati Vidyapeeth's College of Pharmacy, Kolhapur | Kolhapur | Pune | Master of Pharmacy | Shivaji University | Pharmacutical Chemistry | 10 | 15 | **5** | Increase Intake |
| 37 | 6256 | PCI-247 | Bharati Vidyapeeth's College of Pharmacy, Kolhapur | Kolhapur | Pune | Bachelor of Pharmacy | Shivaji University | Pharmacy | 60 | 100 | **40** | Increase Intake |
| 38 | 2152 | PCI- 2049 | Shivlingeshwar College of Pharmacy, Almala, Dist. Latur | Latur | Aurangabad | Master of Pharmacy | Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded | Pharmaceutics | 0 | 15 | **15** | New Course |
| 39 | 2152 | PCI- 2049 | Shivlingeshwar College of Pharmacy, Almala, Dist. Latur | Latur | Aurangabad | Master of Pharmacy | Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded | Pharmaceutical Chemistry)- | 0 | 15 | **15** | New Course |
| 40 | 6393 | PCI-134 | Samarth Education Trust Arvind Gavali college of Pharmacy, Satara | Satara | Pune | Bachelor of Pharmacy | Shivaji University | Pharmacy | 60 | 100 | **40** | Increase Intake |
| 41 | 5439 | PCI-1413 | Dr Naikwadi College of D Pharmacy, Jamgaon Sinnar | Nashik | Nashik | Bachelor of Pharmacy | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | Pharmacy | 60 | 100 | **40** | Increase Intake |
| 42 | 4210 | PCI-824 | Shree Tuljabhavani Sevabhavi Saikshanik & Samajik Sanstha, Hi-Tech College of Pharmacy, Morwa, Chandrapur | Chandrapur | Nagpur | Master of Pharmacy | Gondwana University | Pharmacognosy | 0 | 15 | **15** | New Course |

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४४२, ४४३,

ई-मेल–desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्र. २/ एनजीसी/फार्मसी/मान्यता/(५४/२०२१)/ ८८८ दिनांकः 21 SEP 2021

प्रति,
प्राचार्य,
समर्थ एज्युकेशनल ट्रस्टचे अरविंद गवळी कॉलेज ऑफ फार्मसी,
सर्व्हे नंबर २६१, मु.जैतापूर, सातारा रहिमतपूर रोड,
ता. सातारा ४१५००४

(डीटीई कोड -६३९३)

विषय : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून कायम विना-अनुदान तत्त्वावर विद्यमान संस्थेत सद्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ सुरू करण्याबाबत.

संदर्भ : शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०२१/प्र.क्र.११०/तांशि ४, दि. २९ जुलै, २०२१

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शै.व.२०२१-२२ पासून कायम विना-अनुदान तत्वावर विद्यमान संस्थेत सद्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ खाली दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह विहित अटींच्या अधिन राहून सुरू करण्यास परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १ | बी फार्मसी | ६०-१०० |

आपल्या संस्थेने शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व इतर अटी यांचे पालन करण्याबाबत नोंदणीकृत हमीपत्र प्रपत्र "अ" व "ब" या संचालनालयास सादर केलेले आहे. आपल्या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून कायम विना अनुदान तत्वावर विद्यमान संस्थेत सद्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ सुरु करण्यास नियतठेव म्हणून **रु १.५० लाख पावती क्र. ०३५८७४५ दि. ०९.०८.२०२१, अन्वये बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा – सातारा सिटी,** येथे संस्थेचे अध्यक्ष व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात १० वर्षासाठी जमा केलेले आहेत.

संदर्भांकित शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्ती सह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून कायम विना अनुदान तत्वावर वरीलप्रमाणे विद्यमान संस्थेत सद्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ सुरु करण्यास व संबंधित विद्यापीठाची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांना विहित पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली तसेच शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.
२. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या संकेतांक क्रमाक व पासवर्डद्वारे शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी अद्ययावत करतील.
३. संस्थेने प्रवेशासाठी संबंधित पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश नियामक प्राधिकरण यांचेकडे, तसेच संबंधित पदविका अभ्यासक्रमांची तंत्र शिक्षण संचालनालय यांचेकडे नोंदणी व तद्अनुषंगिक कार्यवाही करणे आवश्यक राहील.
४. शासनाने, या संचालनालयाने, **शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर** व फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासन /फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली, यांना राहतील.
५. वरील अभ्यासक्रम शिवाजी विद्यापीठाने स्थानिक चौकशी समितीने घातलेल्या अटी पूर्ततेच्या अधीन राहून दिलेल्या मान्यतेच्या आधारे मान्यता देण्यात येत असून याबाबत काही अडचणी निर्माण झाल्यास त्यास संबंधित संस्था सर्वस्वी जबाबदार राहील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती व वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे आपणास बंधनकारक राहील.

(डॉ.अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत- मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र शासन, ९ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायर मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१

त्यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तूत संस्थेने आपल्या कार्यालयाकडे नोंदणी केल्याशिवाय प्रस्तूत अभ्यासक्रमांस प्रवेश करण्यात येऊ नयेत.

२. मा. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
४. कार्यासन क्र. २ अ मुख्य कार्यालय, मुंबई.
५. कायासन क्र.३ आयटी सेल, मुख्य कार्यालय, मुंबई.
६. निवड नस्तीस.

ARVIND GAVALI COLLEGE OF PHARMACY,SATARA
Inward No. 58/2021
Date: 24/09/2021.

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 0231 2609091, 2609135 Website : www.unishivaji.ac.in E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation → Affiliation T2 Circulars (2) Affiliation → Affiliation T2 Information Lists
Estd : 1962
" A++" Accrediated by NAAC (2021) With CGPA 3.52
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१ ०२३१ २६९१५३३ व ००९१ ०२३१ ६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१, २६०९१३५

संदर्भ क्र.: संलग्नता/टी-2/SAT /वि.प.विषय क्र.77 दि.20/08/2021/ № 0 0 0 9 9 दि. 03 SEP 2021

प्रति,
मा. प्राचार्य,
अरविंद गवळी कॉलेज ऑफ फार्मसी,
मु. जैतापूर, पो. चिंचणेर, जि. सातारा .

**विषय : आपल्या महाविद्यालयाच्या खालील अभ्यासक्रमांच्या संलग्नीकरण प्रकाराबाबत विद्यापीठाची मान्यता.**
**संदर्भ : 1. आपला AGCOP/124/2021 दि.02/02/2021 रोजीचा प्रस्ताव.**
2. शासन आदेश क्रमांक टीईएम-2021/प्र.क्र.110/तांशि-4 दि. 29/07/2021.

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय व संदर्भानुसार आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाकडून जून, 2021 पासून खालील संलग्नीकरण प्रकार व अभ्यासक्रमाचे प्रस्ताव मान्यतेकरीता प्राप्त झाले होते. सदर प्रस्तावास उपरोक्त नमुद शासन निर्णयान्वये मान्यता प्राप्त झाली आहे. सदर मान्यतेमधील अटी व शर्ती तसेच, स्थानिक चौकशी समितीने घातलेल्या खालील अटी पुर्ततेच्या अधीन राहून विद्यापीठ अधिकार मंडळाने पुढीलप्रमाणे मान्यता दिली आहे.

| संलग्नीकरण प्रकार | प्रस्ताव प्रकार अभ्यासक्रम / विषय | विद्यापीठाची मान्यता |
|---|---|---|
| प्राथमिक संलग्नीकरण | - प्रवेश क्षमता वाढ<br>बी. फार्मसी 60 वरून 100 | जून 2021 पासून एका वर्षासाठी |

**स्थानिक चौकशी समिती/छाननी समितीने नमूद केलेल्या अटी खालीलप्रमाणे आहेत.**

1. प्रवेश क्षमता वाढीस (60 ते 100) आवश्यक असणारे प्रत्येकी 01 सहाय्यक प्राध्यापक फार्मा.केमिस्ट्री, 01 सहाय्यक प्राध्यापक फार्मास्युटीक्स, 01 सहाय्यक प्राध्यापक फार्माकोलॉजी ही पदे रितसर भरण्यात यावीत.
2. ग्रंथालयामध्ये 100 पुस्तके खरेदी करण्यात यावी.
3. आवश्यक ग्लासवेअर्स आणि केमिकल्स खरेदी करण्यात यावी.

प्राथमिक संलग्नीकरणाची मान्यता ही स्थानिक चौकशी समितीने व छाननी समितीने घातलेल्या अटी पूर्ततेच्या अधीन राहून केली असल्याने महाविद्यालयाने सदरच्या सर्व अटींची पूर्तता करुन संबंधित कागदपत्रांच्या सत्यप्रतीसह **अटीपूर्तता अहवाल या पत्राच्या दिनांकापासून दोन महिन्यात विद्यापीठास सादर करावा.** त्या अटींची पूर्तता केल्यानंतर व त्यास विद्यापरिषदेने मान्यता दिल्यानंतरच सदरच्या प्राथमिक संलग्नीकरणाची मान्यता कायम केली जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

**तसेच उपरोक्त मान्यतेचा कालावधी लक्षात घेऊन पुढील संलग्नता मान्यतेचा प्रस्ताव विहीत शुल्कासह विद्यापीठास मुदतीत सादर करण्याची योग्य ती दक्षता घ्यावी.**

कळावे,

ARVIND GAVALI COLLEGE OF PHARMACY,SATARA
Inward No. 57/21
Date: 06/09/2021

आपला विश्वासु,

(डॉ. विलास डी. नांदवडेकर)
कुलसचिव

प्रत :- 1. पात्रता विभाग, 2. संबंधित परीक्षा विभाग, 3. परीक्षक नियुक्ती विभाग,
4. अभ्यास मंडळे विभाग, 5. संलग्नता (शिक्षक मान्यता) विभाग,

COLLEGE OF PHARMACY JAITAPUR AGCPS SATARA

Principal
ARVIND GAVALI COLLEGE OF PHARMACY,SATARA

G:\23.04.2021\sm\sm\2021-22\LIC\प्राथमिक संलग्नीकरण मान्यता.docx

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 0231 2609091, 2609135 Website : www.unishivaji.ac.in E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation → Affiliation T2 Circulars (2) Affiliation → Affiliation T2 Information Lists
Estd : 1962
" A++" Accrediated by NAAC (2021) With CGPA 3.52
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१ ०२३१ २६९१५३३ व ००९१ ०२३१ ६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१, २६०९१३५

संदर्भ क्र.संलग्नता/टी-२/एसएससी/वि.प.विषय क्र.१७ दि.१८.०६.२०२१/ दि. 30 JUL 2021

No 00515

प्रति,

मा. प्राचार्य,

अरविंद गवळी कॉलेज ऑफ फार्मसी,

गट नं. २६१, मु. जैतापूर,

पो.चिंचनेर वंदन, ता. व जि. सातारा.

**विषय : आपल्या महाविद्यालयाच्या खालील अभ्यासक्रमांच्या संलग्नीकरण प्रकाराबाबत विद्यापीठाची मान्यता.**

**संदर्भ : आपले जा.क्र. १. AGCOP/९७/२०२० दि.२७.०८.२०२०**

**२. AGCOP/९८/२०२० दि.२७.०८.२०२० रोजीचे प्रस्ताव.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय व संदर्भानुसार आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाकडून जून, २०२१ पासून खालील संलग्नीकरण प्रकार व अभ्यासक्रमाचे प्रस्ताव मान्यतेकरीता प्राप्त झाले होते. छाननी समितीने नमुद केलेल्या अटी पुर्ततेच्या अधीन राहून विद्यापीठ अधिकार मंडळाकडून सदर प्रस्तावास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संलग्नीकरणाचा प्रकार | अभ्यासक्रम/शाखा | विद्यापीठाची मान्यता | ६५% पेक्षा कमी गुणांकन प्राप्त झालेले वर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | नुतनीकरण | १. बी.फार्मसी. भाग १ ते ४ (६०)<br>२. एम.फार्मसी भाग १, २ - फार्मास्युटिक्स (१८) | जून २०२१ पासून तीन (०३) वर्षासाठी | निरंक |

**छाननी समितीने नमूद केलेल्या अटी खालीलप्रमाणे आहेत.**

१. यापुर्वीच्या संलग्नीकरण मान्यतेच्या पत्रामधील काही अटींची पुर्तता झाली नसल्यास सदर अटींची पुर्तता करण्यात यावी.

**टिप :**

१. नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार प्रस्तावाच्या अनुषंगाने महाविद्यालयांनी विद्यापीठास सादर केलेल्या गुणांकनानुसार, छाननी समितीने दिलेला अभिप्राय व आपल्या महाविद्यालयास नियमित प्राचार्य, ग्रंथपाल, शारिरीक शिक्षण संचालक (आवश्यकतेनुसार) आणि सबंधित अभ्यासक्रमामध्ये आवश्यक असणा-या शिक्षक पदांच्या विद्यापीठ निवड समितीमार्फत केलेल्या नियुक्त्या, शिक्षकेत्तर पदांच्या नियुक्त्या आणि इतर उपलब्ध आवश्यक भौतिक सुविधा इ. अवलोकनी घेवून विद्यापीठ अधिकार मंडळाने उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केल्यानुसार संलग्नीकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार यास मान्यता दिली आहे.

ARVIND GAVALI COLLEGE OF PHARMACY JAITAPUR * SATARA * AGCPS

...२

२. आपल्या महाविद्यालयास/संस्थेस आवश्यक असणारे नॅक/एनबीए मुल्यांकन/पुनर्मुल्यांकन केले नसल्यास ते त्वरित करून घेणे बंधनकारक राहील. याबाबतची पूर्तता झाली नसल्यास पुढील नुतनीकरण/नैसर्गिक विस्तार यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.

३. शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून पुढील सलग तीन वर्षामध्ये प्रपत्र 'अ', 'ब' किंवा 'क' मध्ये ६५% पेक्षा कमी गुण प्राप्त झाल्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम १२० अन्वये संलग्नीकरण रद्द करण्याबाबतच्या प्रक्रियेचा प्रस्ताव विद्यापीठ अधिकार मंडळासमोर सादर करण्यात येईल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाची/नैसर्गिक विस्ताराची मान्यता ही छाननी समितीने घातलेल्या अटी पूर्ततेच्या अधीन राहून केली असल्याने महाविद्यालयाने सदरच्या सर्व अटींची पूर्तता करुन संबंधित कागदपत्रांच्या सत्यप्रतीसह **अटीपूर्तता अहवाल या पत्राच्या दिनांकापासून दोन महिन्यात विद्यापीठास सादर करावा.** त्या अटींची पूर्तता केल्यानंतर व त्यास विद्यापरिषदेने मान्यता दिल्यानंतरच सदरच्या संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाची मान्यता कायम केली जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

**तसेच उपरोक्त मान्यतेचा कालावधी लक्षात घेऊन पुढील संलग्नता मान्यतेचा प्रस्ताव विहीत शुल्कासह विद्यापीठास मुदतीत सादर करण्याची योग्य ती दक्षता घ्यावी.**

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
संलग्नता/टी-२ विभाग

प्रत :- १. पात्रता विभाग, २. संबंधित परीक्षा विभाग, ३. परीक्षक नियुक्ती विभाग,
४. अभ्यास मंडळे विभाग, ५. संलग्नता (शिक्षक मान्यता) विभाग, ६. पी.जी. प्रवेश.

ARVIND GAVALI COLLEGE OF PHARMACY, JAITAPUR * SATARA * AGCPS

Principal
ARVIND GAVALI COLLEGE
OF PHARMACY, SATARA

F:\Baba\2021\Continuation & Natural Growth 2021-22 - Satara District\Final Affiliation Approval Letter 2021-22 - Satara District.Doc